Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

शाळा-महाविद्यालय परिसरात पोलिस पेट्रोलिंग वाढवा;
(पान २ वर)



। गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १५२-- ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

## विवाहांमुळे व्यक्तीचे वैयक्तिक स्वांतत्र्य हिरावले जात नाही

मुंबई : पतीवर वैवाहिक बलात्काराच्या अपवादाची तरतूद असतानाही बलात्काराचा खटला चालवला जाऊ शकतो का, या महत्त्वाच्या कायदेशीर मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. ९ सप्टेंबर) विचारमंथन केले. या अपवादाच्या वैधानिक वैधतेला दिलेल्या व्यापक आव्हानावर सुनावणी घेण्यापूर्वी, न्यायालयात पत्नीला "लैंगिक गुलाम" म्हणून वागवल्याचा आरोप असलेल्या कर्नाटकातील एका प्रकरणात प्रथम सुनावणी घेतली जाईल. दरम्यान, केंद्र सरकारने संबंधित प्रकरणांमध्ये आपले उत्तर दाखल केले असून, दोन दिवसांत सर्व वकिलांना त्याच्या प्रती पुरवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच अंतिम सुनावणीपूर्वी सर्व पक्षांना त्यांची कागदपत्रे आणि याचिका संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### एकनाथ शिंदेंना इशारा; राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत यांच्यावरही निशाणा

# तर एका फटक्यात संपाल: मनोज जरांगे

## उपोषणाच्या बाराव्या दिवशी मनोज जरांगेंचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । मुंबई मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज 12 वा दिवस आहे. मनोज जरांगे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. विशेष म्हणजे त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना त्यांना मोठा इशारा दिला आहे. मराठ्यांना मराठ्यांच्या अंगावर सोडत असाल तर तुम्ही खूप लवकर संपाल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.**

यावेळी त्यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत यांच्यावरही निशाणा साधला."तुम्हाला आरक्षण द्यायचं जिवावर आलं. तुम्हाला मराठ्यांना संपवायचं आहे ही तुमची भूमिका आहे. तुम्ही छत्रपती संभाजीनगरला येऊन फक्त आंदोलन मोडीत काढण्याचं षडयंत्र करत आहात. तुम्ही हारलेले आहात. तुमचा नाकर्तेपणा सिद्ध झाला आहे. तुम्ही सपशेल हारले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठ्यांना आरक्षण देऊच शकत नाही हे तुम्ही स्पष्ट संगायला पाहिजे", असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

"उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मंत्री संजय शिरसाट यांच्याकडून प्रमाणपत्र रद्द करुन घेतले. तेव्हा तुमचे मराठे कुठे गेले? तुम्ही म्हणता ना त्यांच्याकडेदेखील मराठा समर्थक



आहेत. तुमचेच मराठ्यांचे प्रमाणपत्र रद्द झाले ना? जे समर्थक समोर येत आहेत, शिंदे त्यांना समोर आणत आहेत. जात प्रमाणपत्र रद्द व्हायला लागले असताना मराठ्यांना कळत नाही का संजय शिरसाटांना बोलायला पाहिजे.

तुमची जातच पक्ष आहे का? जे शिंदेंचे समर्थक आहेत त्यांनी प्रमाणपत्र रद्द केले त्यांना सांगावं", असं मनोज जरांगे म्हणाले. "एकनाथ शिंदेंना म्हणावं की, हे नाटकं खेळू नका. मराठेच मराठ्यांच्या अंगावर सोडायचं हे नाटक खेळू नका. असं केलं तर खूप लवकर संपाल. एकनाथ शिंदेंना म्हणा, लवकर शहणे व्हा. आणखी हातातून गेलं तर एका फटक्यात संपाल", अशा इशारा जरांगे यांनी दिला. एकनाथ शिंदेंचा लंडनमधील सन्मान ते मनोज जरांगेंचं उपोषण; संजय राऊत यांची सनसनाटी प्रतिक्रिया "तुम्ही संभाजीनगरमध्ये बसून दंगल करायचं ठरवलं आहे. मी हे परवा सांगितलं आहे.

हे सगळ्यांचं मिळून षडयंत्र आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे वेगळे लोकं चर्चेला यायचे आणि मंत्री उदय सामंत यांच्याकडे वेगळे लोकं चर्चेला यायचे.

एकनाथ शिंदेंना मराठा मराठ्यात मारामाऱ्या लावायच्या आहेत. याला पूर्ण एकनाथ शिंदे जबाबदार राहणार आहेत", असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला. "संयम सोडून तुम्ही मराठ्यांचं काय करणार? महाविकास आघाडीसह तुम्ही एकत्र या. येत्या 12 सप्टेंबरला निर्णय होणारच आहे. उदय सामंत यांना दोन महिन्यांपासून सांगतोय की, प्रमाणपत्र द्या. एकनाथ शिंदे आणि माझे संबंध पहिल्यारखे राहतील. तुमची तळमळ तुमच्या नेत्यासाठी, माझी तळमळ मराठ्यांच्या लेकरांसाठी आहे. तुमच्यात आणि आमच्यात हा फरक आहे", असं जरांगे म्हणाले "तुम्हाला नीट बोलून काय करायचं? तुम्ही कोणती भाषा आहे? पाच-पन्नास गुंड आणणार? ते काय करणार? आमचे लोकंदेखील त्यांना ठेचणार.

### जरांगेंचा शिंदेंना इशारा

"एकनाथ शिंदेंना म्हणावं की, हे नाटकं खेळू नका. मराठेच मराठ्यांच्या अंगावर सोडायचं हे नाटक खेळू नका. असं केलं तर खूप लवकर संपाल. एकनाथ शिंदेंना म्हणा, लवकर शहणे व्हा. आणखी हातातून गेलं तर एका फटक्यात संपाल", अशा इशारा जरांगे यांनी दिला. एकनाथ शिंदेंचा लंडनमधील सन्मान ते मनोज जरांगेंचं उपोषण; संजय राऊत यांची सनसनाटी प्रतिक्रिया "तुम्ही संभाजीनगरमध्ये बसून दंगल करायचं ठरवलं आहे.

# इंजिनिअरिंग प्रवेशावेळी अतिरिक्त शुल्क आकारल्यास संस्थेवर कारवाई; पालकांच्या तक्रारीची दखल

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यातील काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थी आणि पालकांची अतिरिक्त फी, किंवा इतर फीच्या नावाखाली पिळकवणूक होत असते. गेल्या काही दिवसांपूर्वी पुण्यातील इंजिनिअरींगच्या कॉलेजकडून तशी शैक्षणिक फी शिवाय अधिकची रक्कम आकारली जात असल्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियातून समोर आल होते. तर, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थी, व पालकांनीही तक्रारी केल्या आहेत. त्याच, पार्श्वभूमीवर मंजूर नसलेले नियमबाह्य शुल्क आकारताना आढळल्यास, संबंधित संस्थेवर कडक कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे शुल्क नियामक प्राधिकरणाने म्हटले आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांचे पालक आणि काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने अनेक संस्था अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून अवाजवी नियमबाह्य शुल्क आकारत आहेत. पालकांनी आपल्या तक्रारी इंजिनिअरींग कॉलेजकडून रोख स्वरुपात किंवा इतर कारणास्तव अवाजवी पैशांची मागणी केली जात असल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. त्यानंतर, सीईटी सेलने संबंधित तक्रारींची दखल घेत महाविद्यालयांना कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिलाय. संबंधित सर्वांना याद्वारे सूचित करण्यात येते की, शुल्क नियामक प्राधिकरण हे संपूर्ण संस्थेसाठी शुल्क मंजूर करते. शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्काच्या व्यतिरीक्त अतिरिक्त शुल्क, रोखीने मागणी केलेले शुल्क इत्यादी घेणे बेकायदेशीर आणि पूर्णपणे प्रतिबंधित आहे.




सर्व संस्थांनी केवळ शिक्षण शुल्क प्राधिकरणाने मंजूर केलेले अचूक शुल्कच आकारणे बंधनकारक आहे, तसेच अधिकृत मंजुरी आदेश त्यांच्या सूचना फलकांवर आणि संकेतस्थळांवर प्रकाशित करणे आवश्यक आहे.कोणतीही संस्था मंजूर नसलेले नियमबाह्य शुल्क आकारताना आढळल्यास, त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल आणि अशा संस्थांमधील नियमबाह्य प्रवेश रद्द करण्यात येतील, याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी, असे सीईटी सेलने म्हटले आहे. त्यामुळे, आता राज्यातील कुठल्याही अभियांत्रिकी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारल्यास संबंधित संस्थेला कारवाईला सामोर जावे लागणार आहे. राज्यातील काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थी आणि पालकांची अतिरिक्त फी, किंवा इतर फीच्या नावाखाली पिळकवणूक होत असते. गेल्या काही दिवसांपूर्वी पुण्यातील इंजिनिअरींगच्या कॉलेजकडून तशी शैक्षणिक फी शिवाय अधिकची रक्कम आकारली जात असल्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियातून समोर आल होते. तर, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थी, व पालकांनीही तक्रारी केल्या आहेत. त्याच, पार्श्वभूमीवर मंजूर नसलेले नियमबाह्य शुल्क आकारताना आढळल्यास, संबंधित संस्थेवर कडक कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे शुल्क नियामक प्राधिकरणाने म्हटले आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांचे पालक आणि काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने अनेक संस्था अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून अवाजवी नियमबाह्य शुल्क आकारत आहेत. कॉलेजकडून रोख स्वरुपात किंवा इतर कारणास्तव अवाजवी पैशांची मागणी केली जात असल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. त्यानंतर, सीईटी सेलने संबंधित तक्रारींची दखल घेत महाविद्यालयांना कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिलाय.

# समाधान सरवणकरांच्या लाडक्या लेकाच्या बारशाचा थाटमाट

जन सम्राट टाईम्स

**मुंबई |प्रतिनिधी:** मराठी इंडस्ट्रीतली प्रसिद्ध अभिनेत्री तेजस्विनी लोणारी आणि तिचे पती शिवसेना नेते समाधान सरवणकर यांच्या आयुष्यात चिमुकल्या पावलांनी गोंडस पाहुणा आलाय. चिमुकल्या पाहुण्याच्या येण्यानं सरवणकरांच्या घरात आनंदाचं वातावरण पाहायला मिळत आहे. 22 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध मराठी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी एका गोंडस मुलाला जन्म दिला. त्यावेळी सरवणकरांनी त्यांच्या घरी आलेल्या छोट्या बाळराजांचं स्वागत थाटामाटात केलेलं. त्यावेळचे काही फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झालेले. अशातच 9 सप्टेंबर रोजी तेजस्विनी लोणारी आणि समाधान सरवणकर यांच्या चिमुकल्या बाळाचं बारसं मोठ्या धुमधडाक्यात पार पडलं. याच सोहळ्यात बाळाचं गोड असं नावंही ठेवण्यात आलंय. 'राजश्री मराठी'नं त्यांच्या इन्स्टा हँडलवर तेजस्विनी लोणारी आणि शिवसेना नेते समाधान सरवणकर यांच्या लाडक्या लेकाच्या नामकरण सोहळ्याचे फोटो शेअर केले आहेत. तेजस्विनी आणि समाधान यांनी आपल्या नावाप्रमाणेच बाळाचंही नाव चार अक्षरी ठेवलंय. बाळाच्या नावाची सध्या सोशल मीडियावर तुफान चर्चा रंगली आहे. तसेच, बारशाच्या फोटोंवरही चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव केला जातोय. मराठमोळी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी आणि शिवसेना नेते समाधान सरवणकर यांनी डिसेंबर 2025 मध्ये लग्न केलेलं आणि ऑगस्ट 2026 मध्ये त्यांनी आपल्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं. 9 सप्टेंबरला आपल्या लाडक्या लेकाचं मोठ्या थाटामाट बारसं केलं आणि बाळाचं सुंदर नाव ठेवलं. तेजस्विनी आणि समाधान यांनी आपल्या चिमुकल्याचं नाव 'समराज' असं ठेवलंय.

# विद्यानंद बापट यांना कायदेशीर नोटीस

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** गेल्या काही दिवसांपासून देवी-देवता आणि धार्मिक श्रद्धेविषयी कथित आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट (Vidyanand Bapat) यांना मुंबई उच्च न्यायालयातील वकील प्रदीप नाईक यांनी कायदेशीर नोटीस बजावली आहे. विद्यानंद बापट यांनी नोटीस मिळाल्यापासून 48 तासांच्या आत लेखी स्पष्टीकरण देऊन हिंदू भाविकांची बिनशर्त माफी मागावी, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे. तसेच नमूद वेळेत समाधानकारक खुलासा न झाल्यास फौजदारीसह अन्य कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पुण्यातील गणेश उत्सवात वाजले जाणारे डीजे साउंड सिस्टिम विरोधात विद्यानंद बापट भूमिका मांडत आहेत. बापट यांची मुलाखत आणि त्यातील काही मुद्दे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल सुद्धा झाले आहेत. दरम्यान, गणेशोत्सव, हिंदू धार्मिक परंपरा आणि भगवान श्री गणेश यांच्याविषयी केलेली वक्तव्ये अवमानकारक आणि आक्षेपार्ह असल्याचा दावा नोटिसद्वारे करण्यात आला आहे. ध्वनीप्रदूषण,



लाऊडस्पिकर, मिरवणुका अथवा सार्वजनिक उत्सवांबाबत कायदेशीर आणि सभ्य पद्धतीने मत मांडण्याच्या अधिकाराला विरोध नसल्याचे ॲड. नाईक यांनी त्यांच्या याचिकेत स्पष्ट केले आहे. मात्र, अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली धार्मिक श्रद्धा आणि आराध्य दैवतांचा अवमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही, अशी भूमिका नोटीसमधून स्पष्ट करण्यात आली आहे. एका व्यक्तीच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा वापर इतरांच्या धार्मिक भावना दुखावण्यासाठी होऊ नये, असे सुद्धा या नोटीसीमध्ये नमूद करण्यात आले आहे.विद्यानंद बापट यांच्यामागे कोणताही राजकीय, सामाजिक असा मोठा परिचय नाही. विद्यानंद बापट हे 37 वर्षीय असून ते बीपीओ क्षेत्रात काम करतात. त्यांचं बहुतांश काम हे घरातूनच सुरू असतं. मुळचे रत्नागिरीचे असलेले विद्यानंद बापट गेल्या 8 वर्षांपासून पुण्यातील नारायण पेठ येथे राहत आहेत. विद्यानंद बापट यांनी मुंबई विद्यापिठातून वाणिज्य शाखेची पदवी घेतली असून पुण्यातील पुरोगामी संघटनांच्या विविध उपक्रमांमध्ये ते सक्रियपणे सहभागी होत असतात.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# स्वच्छ हवेच्या शर्यतीत पुण्याची झेप; देशात 12वे स्थान

## ठाणे महाराष्ट्रात अव्वल; नवी मुंबई नवव्या, नागपूर दहाव्या तर मुंबई २८व्या क्रमांकावर

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी:** वाहतूक कोंडी, वाढती वाहनसंख्या, रस्त्यांवरील धूळ, बांधकाम प्रकल्प आणि काही भागांतील औद्योगिक उत्सर्जनामुळे वायुप्रदूषणाचे आव्हान असतानाही पुणे शहराने स्वच्छ हवेच्या राष्ट्रीय क्रमवारीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. केंद्र सरकारच्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६' अंतर्गत दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात पुण्याने २०० पैकी १८३ गुण मिळवत देशात १२वे स्थान पटकावले आहे. या क्रमवारीत ठाणे सातव्या क्रमांकावर राहून महाराष्ट्रात अव्वल ठरले आहे. नवी मुंबईने नववा, नागपूरने दहावा तर पुण्याने बारावा क्रमांक मिळवला आहे. मुंबई २८व्या आणि नाशिक २९व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये वायुप्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांमध्ये पुण्याची कामगिरी समाधानकारक असल्याचे चित्र या सर्वेक्षणातून समोर आले आहे. विविध निकषांवर शहरांचे मूल्यमापन 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्रॅम' (एनसीएपी) अंतर्गत हे सर्वेक्षण करण्यात आले. वायुप्रदूषण नियंत्रणासाठी शहरांनी केलेल्या उपाययोजना, शहर कृती आराखड्याची अंमलबजावणी, रस्त्यांवरील धूळ नियंत्रण, बांधकामांमधून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी केलेले प्रयत्न, बांधकाम कचरा व्यवस्थापन, वाहन व औद्योगिक उत्सर्जनावरील नियंत्रण, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती



अशा विविध निकषांवर शहरांचे मूल्यमापन करण्यात आले. पुण्याला मिळालेल्या १८३ गुणांमुळे शहराने या प्रयत्नांमध्ये चांगली कामगिरी केल्याचे स्पष्ट होते. मात्र, वाढती लोकसंख्या आणि वेगाने सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांमुळे शहरासमोरील वायुप्रदूषणाचे आव्हान कायम आहे. पुण्यासमोरील प्रमुख आव्हाने पुण्यातील वाढती वाहनसंख्या आणि वाहतूक कोंडी हे वायुप्रदूषणातील महत्त्वाचे घटक ठरत आहेत. त्याचबरोबर मेट्रो आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे सुरू असलेली बांधकामे, रस्त्यांवरील धूळ, बांधकाम साहित्याची वाहतूक आणि काही भागांतील औद्योगिक उत्सर्जन यावर प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे. विशेषतः पीएम १० आणि पीएम २.५ या सूक्ष्म व अतिसूक्ष्म धुलिकणांचे प्रमाण कमी करण्याचे आव्हान पुण्यासमोर आहे. त्यामुळे सर्वेक्षणातील चांगली कामगिरी कायम ठेवतानाच पुढील काळात प्रत्यक्ष हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजनांची गरज आहे. मध्यम शहरांमध्येही महाराष्ट्राची कामगिरी तीन ते दहा लाख लोकसंख्या असलेल्या मध्यम शहरांच्या गटातही महाराष्ट्रातील अनेक शहरांनी सहभाग नोंदवला आहे. अमरावतीने तिसरा क्रमांक मिळवत महाराष्ट्रात सर्वोत्तम कामगिरी केली आहे. लातूर सातव्या, उल्हासनगर १६व्या, सोलापूर १७व्या, सांगली २३व्या, जळगाव २४व्या, अकोला २६व्या आणि चंद्रपूर ३०व्या क्रमांकावर आहे. प्रभागस्तरावरही उल्लेखनीय नोंद प्रभागस्तरावरील कामगिरीत नाशिक महापालिकेचा प्रभाग क्रमांक ७ राष्ट्रीय क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर राहिला आहे. पुणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ४ (खराडी-वाघोली) आणि प्रभाग क्रमांक ७ (गोखलेनगर, औंध) यांनीही राज्यस्तरावर नोंद केली आहे. अमरावतीच्या प्रभाग क्रमांक १२चीही उल्लेखनीय कामगिरी झाली आहे. पुण्याने स्वच्छ हवेच्या राष्ट्रीय क्रमवारीत १२वे स्थान मिळवले असले, तरी वाढती वाहतूक, बांधकामे आणि धुलिकणांचे प्रदूषण कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक ठरणार आहे. वाहतूक कोंडी, वाढती वाहनसंख्या, रस्त्यांवरील धूळ, बांधकाम प्रकल्प आणि काही भागांतील औद्योगिक उत्सर्जनामुळे वायुप्रदूषणाचे आव्हान असतानाही पुणे शहराने स्वच्छ हवेच्या राष्ट्रीय क्रमवारीत उल्लेखनीय कामगिरी केली.

# नोटीस काढण्याची हिंमत झालीच कशी?

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** न्यायालयाचा स्पष्ट आदेश असताना त्या मॅजिस्ट्रेटची नोटीस बजावण्याची हिंमत झालीच कशी? असा संतप्त सवाल करत सर्वोच्च न्यायालयाने ग्रेटर नोएडाच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना (एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट) चांगलेच फटकारले. विद्यार्थ्यांवर कोणतीही कठोर किंवा दंडात्मक कारवाई करण्यास बंदी घातलेली असतानाही एका विद्यार्थ्याला नोटीस पाठवल्याप्रकरणी तीव्र नाराजी बुधवारी व्यक्त केली.सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने ग्रेटर नोएडाच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या या भूमिकेवर तीव्र ताशेरे ओढले. सुनावणीदरम्यान खंडपीठाने नमूद केले, कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही कठोर किंवा दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, हे आम्ही यापूर्वीच अगदी स्पष्ट



केले होते. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश डावलून कोणताच मॅजिस्ट्रेट अशा प्रकारे नियम मोडू शकत नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १३० अन्वये ही नोटीस बजावण्यात आली होती.विद्यार्थ्याची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील बिश्वजित भट्टाचार्य यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, ग्रेटर नोएडाच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी गौतम बुद्ध विद्यापीठाच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला ही 'कारणे दाखवा' नोटीस पाठवली होती. या नोटीसमध्ये शांतता राखण्यासाठी विद्यार्थ्याकडून तब्बल ५ लाख रुपयांचा वैयक्तिक जातमुचलका का घेतला जाऊ नये, अशी विचारणा करण्यात आली होती.

# एरंडोलमध्ये शाळा-महाविद्यालय परिसरात पोलिस पेट्रोलिंग वाढवा; दामिनी पथकाचीही नियुक्ती करा

## नगरसेवक रविंद्र संतोष महाजन यांचे एरंडोल पोलिसांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल । प्रतिनिधी :** एरंडोल शहरातील तसेच शहरालगतच्या शाळा, विद्यालये आणि महाविद्यालय परिसरात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांची गस्त अधिक कडक व शिस्तबद्ध करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक रविंद्र संतोष महाजन यांनी केली आहे. याबाबत त्यांनी एरंडोल पोलिस निरीक्षकांना लेखी निवेदन देऊन विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. शाळा आणि महाविद्यालय भरण्याच्या तसेच सुटण्याच्या वेळेत परिसरात विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या काळात काही समाजकंटकांकडून छेडछाड अथवा अन्य गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अलीकडे काही घटना प्रकार पोलिस प्रशासनासह स्थानिक पालकांच्याही निदर्शनास आल्याचे महाजन यांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलिस यंत्रणेने अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. गर्दीच्या वेळेत नियमित पेट्रोलिंगची मागणी शाळा-महाविद्यालय परिसरात विशेषतः दुपारी ११ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ६ या विद्यार्थ्यांच्या येण्या-जाण्याच्या वेळेत नियमित पोलिस पेट्रोलिंग करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



या वेळेत पोलिसांची प्रत्यक्ष उपस्थिती वाढल्यास विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास मदत होईल, तसेच गैरप्रकारांना आळा बसण्यास हातभार लागेल, असे महाजन यांनी म्हटले आहे. पोलिस प्रशासनाकडून यापूर्वीही संबंधित परिसरात नियमित गस्त घालण्यात येत असल्याचे नमूद करत, सध्याच्या परिस्थितीचा विचार करून ही गस्त अधिक कडक आणि नियोजनबद्ध करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. गणवेश व ओळखपत्राचीही तपासणी करा शाळा आणि महाविद्यालय परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी गणवेशात असणे तसेच ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे. शक्य असल्यास गणवेश व वैध ओळखपत्राशिवाय शाळा-महाविद्यालय परिसरात प्रवेश देऊ नये, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

यामुळे बाहेरील व्यक्तींच्या अनधिकृत प्रवेशावर नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते, असा मुद्दा महाजन यांनी उपस्थित केला आहे. एरंडोलमध्ये दामिनी पथकाची मागणी विद्यार्थिनी तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी एरंडोल शहरात दामिनी पथकाची नियमित गस्त सुरू करणे गरजेचे असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शाळा, महाविद्यालये, प्रमुख चौक, बसस्थानके तसेच विद्यार्थिनींची वर्दळ असलेल्या परिसरात दामिनी पथकाची उपस्थिती वाढविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे केवळ एखादी घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी संभाव्य गैरप्रकार रोखण्यासाठी नियमित गस्त, जनजागृती आणि प्रभावी पोलिस उपस्थिती ठेवण्याची गरज असल्याचे महाजन यांनी निवेदनातून स्पष्ट केले आहे. पालकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याची गरज शाळा-महाविद्यालय परिसरात विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासन, शैक्षणिक संस्था, पालक आणि स्थानिक नागरिक यांनी समन्वयाने काम करण्याची गरज आहे. विद्यार्थिनींना कोणत्याही प्रकारचा त्रास अथवा गैरप्रकार जाणवल्यास त्यांनी तातडीने पालक, शिक्षक किंवा पोलिसांची मदत घ्यावी, यासाठीही जनजागृती करणे आवश्यक आहे. एरंडोल शहरातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीर्याने घेऊन पोलिस प्रशासनाने निवेदनातील मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नगरसेवक रविंद्र संतोष महाजन यांनी व्यक्त केली आहे.

# पाळधी-तरसोद बायपासवर कंटेनर उलटून दोनगावच्या तरुणाचा मृत्यू

जन सम्राट टाईम्स

**पाळधी| प्रतिनिधी:** पाळधी-तरसोद बायपास रस्त्यावर टाहाकळी फाट्याजवळ वेगाने जाणाऱ्या कंटेनरचा वळणावर ताबा सुटून तो पलटी झाल्याची भीषण घटना घडली. या अपघातात बाजूने मोटारसायकलवरून जाणाऱ्या दोनगाव बुद्रुक येथील करण जनार्दन सोनवणे (वय २०) या शिक्षण घेणाऱ्या तरुणाचा कंटेनरखाली दबून जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने दोनगाव बुद्रुकसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर क्रमांक सीजी ०४ एनएस ७४५५ हा पाळधी-तरसोद बायपास मार्गावरून जात असताना टाहाकळी फाट्याजवळ वळणावर चालकाचा ताबा सुटला. त्यानंतर कंटेनर भीषणरीत्या पलटी झाला. त्याचवेळी बाजूने मोटारसायकलवरून जाणारे करण सोनवणे हे मोटारसायकलसह कंटेनरखाली दबले. या दुर्घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. प्रतापराव व विक्रम पाटील यांची घटनास्थळी धाव अपघाताची माहिती मिळताच राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे सुपुत्र प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर अपघाताचे हृदयद्रावक दृश्य पाहूनही त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत स्थानिक नागरिक व प्रशासनाच्या सहकार्याने तातडीने मदतकार्य सुरू केले. स्वतः उपस्थित राहून रुग्णवाहिका पाचारण करण्यात आली तसेच पुढील आवश्यक वैद्यकीय व कायदेशीर कार्यवाहीसाठी प्रशासनाशी समन्वय साधण्यात आला. बायपासचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी दरम्यान, पाळधी-तरसोद बायपास रस्त्याचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. रस्त्याचे काम सुरू असताना वाहतुकीचे योग्य नियोजन, सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि वाहनचालकांसाठी आवश्यक मार्गदर्शन याबाबत अधिक प्रभावी व्यवस्था असणे गरजेचे असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे!

## अडकमोल यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन



जन सम्राट टाईम्स

**भडगाव| प्रतिनिधी :** ओबीसी समाजाची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी तसेच आगामी जनगणनेच्या प्रपत्रात ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय पिछडावर्ग (ओबीसी) मोर्चाच्या माध्यमातून देशभरातील तहसील कार्यालयांबाहेर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाची धग भडगाव तालुक्यातही पोहोचली असून, ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. यावेळी भडगाव तहसीलदार शीतल सोलाट यांना निवेदन देण्यात आले. 'इतर'मध्ये नव्हे, ओबीसींची स्वतंत्र नोंद हवी! जनगणनेच्या प्रपत्रात ओबीसी समाजाची स्वतंत्र नोंद न करता त्यांना 'इतर' या सदरामध्ये समाविष्ट केले जात असल्याने ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या समोर येत नाही, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. ओबीसी समाजाला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय न्याय मिळण्यासाठी जातीनिहाय जनगणना होणे आवश्यक असल्याचे आंदोलकांनी सांगितले. भडगाव येथील आंदोलनाचे प्रमुख प्रभारी विनोद अडकमोल यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. ओबीसींची जातीनिहाय जनगणना होईपर्यंत हा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. विविध संघटनांचा आंदोलनाला पाठिंबा या आंदोलनाला शहरातील विविध सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिला. लहुजी क्रांती मोर्चाचे भगवान शिंदे, राष्ट्रीय व्हीजेएनटीचे देविदास राठोड, जवाहर चव्हाण, भारत मुक्ती मोर्चाचे जाकीर कुरेशी, नागराज धुळे, अभिमान पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल पाटील, विठ्ठल पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून ओबीसींच्या मागणीला समर्थन दिले. 'जनगणना नाही तर न्याय नाही'चा निर्धार ओबीसी समाजाची लोकसंख्या, सामाजिक-आर्थिक स्थिती आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधित्व यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्यासाठी जातीनिहाय जनगणना आवश्यक असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. अचूक आकडेवारीच्या आधारेच धोरणे आखता येतील आणि समाजातील विविध घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय मिळवून देता येईल, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. देशभरातील विविध तालुक्यांमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाच्या माध्यमातून "ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे.

# म्हैसवाडीच्या जिल्हा परिषद शाळेला विकासाची 'नवी कमान'!

जन सम्राट टाईम्स



**मलकापूर। प्रतिनिधी:** म्हैसवाडी येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेच्या विकासाला लोकसहभागाची भक्कम साथ मिळत असून, शाळेच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष तथा माजी सरपंच विनोद जगन्नाथ चौधरी यांच्या पुढाकारातून उभारण्यात येणाऱ्या आकर्षक कमान व मुख्य प्रवेशद्वाराचे भूमिपूजन सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. श्रीफळ वाढून श्री. चौधरी यांच्या हस्ते विधिवत भूमिपूजन करण्यात आले. या सोहळ्यास बुलढाणा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सोपानराव शेलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मुख्याध्यापक सुरेश सैंदाणे यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा, शैक्षणिक गुणवत्तेचा आणि विविध उपक्रमांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. गुणवत्तावाढीने पालकांचा विश्वास वाढला! मुख्याध्यापक सुरेश सैंदाणे यांच्या नेतृत्वाखाली शाळेत विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक तसेच सहशालेय उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर दिसून येत आहे. शाळेचा वाढता शैक्षणिक दर्जा आणि उपक्रमशील वातावरण यामुळे पालकांचा जिल्हा परिषद शाळेकडे विश्वास वाढला असून, विद्यार्थ्यांच्या पटसंख्येतही सातत्याने वाढ होत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि लोकसहभाग यांचा सुरेख संगम साधल्यास ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांचा कायापालट होऊ शकतो, याचे म्हैसवाडी शाळा हे सकारात्मक उदाहरण ठरत आहे. शाळेच्या नवीन प्रवेशद्वारामुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडण्यासोबतच ग्रामस्थांची शाळेविषयीची आत्मीयता आणि बांधिलकीही अधोरेखित होणार आहे. माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा पुढाकार कौतुकास्पद शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी पुढाकार घेतल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील शाळांचा विकास केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता लोकसहभागातूनही प्रभावीपणे करता येतो, असा संदेश या उपक्रमातून मिळत आहे. भूमिपूजन सोहळ्यास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर दिनकर धाडे, उपाध्यक्ष उल्हास निना लोखंडे, सदस्य विनोद साहेबराव लोणे, शिवाजी विलास धाडे, विष्णू भगवान लोणे, अशोक भागवत धाडे, दुर्गेश कैलास धाडे, ज्योती राजू शिरसाठ, ज्योती मंगेश कांडेलकर, प्रतीक्षा राकेश ताटे, राजश्री संजय चौधरी यांच्यासह सौ. सारिका खडसे, सौ. दुर्गा लोणे, सौ. रूपाली पाचपांडे, सौ. वंदना नाले, सौ. मनीषा शेलकर, सौ. कल्पना धाडे, ग्रामस्थ, पालक आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रस्त्याच्या कामातील मशीनच्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू!

## पारोळा रस्त्यावर सावदा फाट्याजवळील घटना

जन सम्राट टाईम्स

**भडगाव। प्रतिनिधी:** लुक्यातील कजगाव-पारोळा रस्त्यावर सावदा फाट्याजवळ बुधवारी सकाळी साडेदहा ते अकराच्या सुमारास रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या मशीनची मोटारसायकलला धडक बसून झालेल्या भीषण अपघातात घुसर्डी येथील प्रविण देविदास पाटील (वय ४०) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करून रस्त्याच्या कामादरम्यान वाहनधारकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली. मिळालेल्या माहितीनुसार, प्रविण पाटील हे मोटारसायकलने कजगाव-पारोळा मार्गावरून जात असताना रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या मशीनची त्यांच्या दुचाकीला धडक बसली. धडक जोरदार असल्याने पाटील यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर नागरिकांचा रास्ता रोको अपघाताची माहिती परिसरात



पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली. या घटनेनंतर नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करत रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी पुरेशा सुरक्षा उपाययोजना करण्यात येत नसल्याबाबत संताप व्यक्त केला. मृताच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, अपघाताची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच अपघातास जबाबदार असणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली. सुरक्षा उपाययोजनांअभावी अपघाताचा धोका? कजगाव-पारोळा रस्त्याचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. कामाच्या ठिकाणी वाहनधारकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक सूचना फलक, दिशादर्शक व्यवस्था, बॅरिकेडिंग आणि इतर सुरक्षा उपाययोजना पुरेशा प्रमाणात करण्यात येत नसल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे. या मार्गावर यापूर्वीही अपघात झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रस्त्याचे काम सुरू असताना अवजड यंत्रसामग्रीचा वापर होत असल्याने वाहनधारकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य नियोजन आणि खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी सांगितले. काही काळ वाहतूक विस्कळीत नागरिकांच्या रास्ता रोको आंदोलनामुळे या मार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. मृतदेह बराच वेळ घटनास्थळीच असल्याने परिस्थिती तणावपूर्ण झाली होती. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

# सोयगावात वीज तार तुटून पडल्याने ग्रामस्थांमध्ये संताप!

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी:** गावातील मेन वीज सप्लाय सातारा डीपीवरून स्ट्रीट लाईटला जोडण्यात आलेली वीज तार मंगळवारी रात्री अचानक तुटून खाली पडल्याची घटना घडली. सुदैवाने यावेळी मोठी जीवितहानी टळली. मात्र, वीज तार तुटून पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, महावितरणच्या कारभाराबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, घटना घडल्यानंतर संबंधित महावितरणच्या इंजिनिअरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, फोन करूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वीज तार रस्त्यावर किंवा रहदारीच्या ठिकाणी तुटून पडल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. 'जीवितहानी झाल्यास जबाबदार कोण?' वीज वाहिनी तुटून पडण्याच्या घटना वारंवार घडत असतील तर संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. भविष्यात अशा घटनेत एखाद्या नागरिकाची जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित महावितरणचे अधिकारी, इंजिनिअर व लाईनमन यांच्यावर निश्चित करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, गावातील वीजभाराच्या दृष्टीने नवीन डीपी बसविण्यात आला आहे. मात्र, या डीपीचे काम ज्या ठेकेदारामार्फत करण्यात आले, ते काम अत्यंत निकृष्ट व बोगस पद्धतीने झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामाची तातडीने पाहणी करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निकृष्ट कामाची चौकशी करून पेमेंट रोखण्याची मागणी नवीन डीपीच्या कामाची गुणवत्ता तपासून संबंधित ठेकेदाराला करण्यात आलेले पेमेंट थांबवावे आणि पेमेंट झाले असल्यास नियमानुसार त्याची वसुली करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या ठेकेदारासह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शेलवडच्या जि.प. प्राथमिक केंद्र शाळेत 'अक्षरहंडी' उपक्रम उत्साहात



जन सम्राट टाईम्स

**शेलवड, ता. बोदवड| प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य विकसित होण्यासोबतच अक्षरओळख, शब्दनिर्मिती आणि वाचनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने जि. प. प्राथमिक केंद्र शाळा शेलवड येथे 'अक्षरहंडी' हा अभिनव शैक्षणिक उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी हंडीमध्ये ठेवलेल्या विविध अक्षरांच्या चिठ्ठ्या निवडून त्यापासून नवीन शब्द तयार केले. तयार केलेल्या शब्दांचे वाचन करून त्यांचा वाक्यात उपयोग करण्याची कृतीही विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना अक्षर, शब्द आणि वाक्यरचनेचा सराव आनंददायी पद्धतीने करता आला. विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, शब्दनिर्मिती, आकलन आणि कल्पनाशक्तीला चालना मिळाली. पारंपरिक पद्धतीपेक्षा खेळ व कृतीच्या माध्यमातून शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अक्षरांशी खेळता-खेळता शब्दांची निर्मिती आणि त्यांचा योग्य वापर करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी आनंददायी ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची उत्सुकता वाढली असून, 'खेळातून शिक्षण' ही संकल्पना प्रभावीपणे रुजविण्यास मदत झाली. शिक्षकांच्या मार्गदर्शनातून अभिनव उपक्रम कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन मुख्याध्यापक श्री. दिलीप जवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक श्री. सुनील माळी, पद्माकर गोसावी, श्रीमती शुभांगी शिंगटे, श्री. विनोद चव्हाण, श्रीमती रेखा चवरे, श्रीमती मिनाक्षी बुर्रेवार, श्रीमती सुप्रिया फुंदे, सौ. सुरेखा कव्हळे, सौ. रेणुका सुरळकर तसेच शंकरगिरी महाराज यांनी केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत अक्षरहंडी उपक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. शाळेत राबविण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडूनही कौतुक होत आहे.विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य विकसित होण्यासोबतच अक्षरओळख, शब्दनिर्मिती आणि वाचनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने जि. प. प्राथमिक केंद्र शाळा शेलवड येथे 'अक्षरहंडी' हा अभिनव शैक्षणिक उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आला.

# भडगावात समाजकल्याण व बार्टीच्या शैक्षणिक योजनांचा जागर

## स्वाधार योजना, वसतिगृह प्रवेश, महाडीबीटी शिष्यवृत्तीची विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती

जन सम्राट टाईम्स

**भडगाव। प्रतिनिधी :** शासनाच्या शैक्षणिक योजनांची माहिती पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने भडगाव तालुक्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये 'योजना विद्यार्थ्यांच्या दारी' हा जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाडकुबाई विद्या मंदिर व दादासाहेब सुपडू मालजी पाटील ज्युनिअर कॉलेज, आदर्श कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच सौ. जयश्री गणेश पूर्णपात्री कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, वसतिगृह प्रवेश प्रक्रिया, समाजकल्याण विभागाच्या विविध शिष्यवृत्ती व शैक्षणिक योजना, महाडीबीटी



पोर्टलवरील शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया तसेच बार्टीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या विविध शैक्षणिक योजनांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. योजनांसाठी आवश्यक पात्रता, कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया तसेच अर्ज भरताना घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. 'माहितीपासून लाभापर्यंत' विद्यार्थ्यांना जोडणे गरजेचे समाजकल्याण तथा बार्टीचे भडगाव तालुका समन्वयक अनिल पगारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शासनाच्या योजनांचा उद्देश स्पष्ट केला. ते म्हणाले, "शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांबरोबरच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आधार देणारी आहे. आर्थिक परिस्थिती, राहण्याची अडचण किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये, यासाठी स्वाधार योजना, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती आणि इतर शैक्षणिक योजनांच्या माध्यमातून शासन मदतीचा हात देत आहे." पुढे बोलताना पगारे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी केवळ योजनांची माहिती घेऊन थांबू नये, तर पात्रतेनुसार लाभ घेण्यासाठी वेळेत अर्ज करावा. एका विद्यार्थ्याला मिळालेली माहिती त्याच्या मित्रांना, कुटुंबीयांना आणि समाजातील इतर गरजू विद्यार्थ्यांनाही उपयोगी ठरू शकते. त्यामुळे 'माहितीपासून लाभापर्यंत' प्रत्येक विद्यार्थ्याला जोडणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे." "शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाची संधी गांभीर्याने घेऊन स्वतःचे भविष्य घडवावे आणि समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे," असे आवाहनही त्यांनी केले..

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# कासोद्यात अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक संपन्न

जन सम्राट टाईम्स

**कासोदा, ता. एरंडोल । प्रतिनिधी:** आगामी श्री गणेशोत्सव तसेच सद्गुरू गोविंद महाराज यांच्या पावन स्मरणार्थ आयोजित अखंड हरिनाम सप्ताह शांततेत, भक्तिभावाने आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात पार पडावा, यासाठी कासोदा पोलीस ठाण्याच्या प्रांगणात सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी शांतता समितीची विशेष बैठक घेण्यात आली. चाळीसगाव परिमंडळाचे अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत उत्सवांच्या नियोजनासोबतच नागरिकांच्या सुरक्षेचे विविध प्रश्नही चर्चेत आले. अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते हे कासोदा पोलीस ठाण्यात प्रथमच आले होते. यावेळी स्थानिक प्रशासन तसेच ग्रामस्थांनी गावातील सामाजिक वातावरण, सण-उत्सवांची परंपरा आणि विविध स्थानिक प्रश्न त्यांच्यासमोर मांडले. कासोद्यात हिंदू-मुस्लिम समाजातील नागरिक परस्पर सहकार्याने सण-उत्सव साजरे करीत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. गावातील या सामाजिक सलोख्याचे कौतुक करत नखाते यांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा संदर्भ देत भक्तीबरोबरच सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि परस्पर सन्मान जपण्याचे आवाहन केले. चोरीच्या घटनांचा मुद्दा ऐरणीवर बैठकीदरम्यान आरपीआयचे तालुकाध्यक्ष प्रवीण बाविस्कर, छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष उमेश पाटील तसेच दोन प्रतिष्ठित नागरिकांनी कासोदा व परिसरातील वाढत्या चोरीच्या घटनांकडे अपर पोलीस अधीक्षकांचे लक्ष वेधले. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी,




पशुपालक तसेच शेतशिवारातील सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांची गस्त वाढविणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे तसेच चोरीच्या घटनांचा प्रभावी तपास करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर नखाते यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले. नेत्रम योजनेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबतही प्रश्न गावात बसविण्यात आलेल्या नेत्रम योजनेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कार्यक्षमतेबाबतही नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला. कॅमेरे नियमितपणे कार्यरत आहेत का, त्यांचे निरीक्षण केले जाते का तसेच एखादी घटना घडल्यास तपासासाठी त्यांचा उपयोग होतो का, याबाबत विचारणा करण्यात आली. सीसीटीव्ही यंत्रणेची नियमित तपासणी व देखभाल करून ती प्रभावीपणे कार्यरत ठेवण्याची मागणी नागरिकांनी केली. अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन गणेशोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही समाजांनी परस्पर सामंजस्य व भाईचारा कायम ठेवावा, असे आवाहन करण्यात आले.

सोशल मीडियावरील अफवा अथवा वाद निर्माण करणाऱ्या संदेशांवर विश्वास न ठेवता कोणतीही अनुचित बाब निदर्शनास आल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असेही सांगण्यात आले. बैठकीच्या प्रारंभी अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच अखंड हरिनाम सप्ताह पंचमंडळाचे अध्यक्ष नंदू खैरनार यांचा नखाते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीस आरपीआयचे तालुकाध्यक्ष प्रवीण बाविस्कर, छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष उमेश पाटील, पत्रकार नरेंद्र पाटील, ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच मुख्तार सर, महिला दक्षता समितीच्या वतीने महानंदाताई पाटील, मुस्लिम पंच कमिटीचे पदाधिकारी, पोलीस पाटील, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, सप्ताह पंचमंडळाचे सदस्य तसेच हिंदू-मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोहेकॉ. नरेंद्र गजरे यांनी प्रास्ताविकातून बैठकीचा उद्देश स्पष्ट केला. विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी आभार मानले. सामूहिक राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली. 'सलोखा कायम ठेवणे ही सर्वांची जबाबदारी' — ASP अशोक नखाते कासोदा पोलीस ठाण्यात प्रथमच आलेल्या अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांनी गावातील हिंदू-मुस्लिम समाजाच्या सलोख्याच्या परंपरेचे कौतुक केले. संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी भक्ती, बंधुभाव आणि सामाजिक एकोप्याचा संदेश दिला. आगामी सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी संयम राखून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. गणेशोत्सव व हरिनाम सप्ताहासाठी प्रशासन सज्ज गणेशोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## कासोद्यात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे !



जन सम्राट टाईम्स

**कासोदा | प्रतिनिधी :** डिजिटल वापराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने भारती विद्या मंदिर, कासोदा येथे इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सायबर सिक्युरिटी व सायबर जनजागृती विषयावर मार्गदर्शनपर सत्र घेण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांना ऑनलाइन जगात सुरक्षित वावरताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले. OTP फ्रॉड, फोटो मॉर्फिंग, बनावट लिंकद्वारे फसवणूक, बँक फ्रॉड, फेक कॉल, फेक मेसेज आणि सोशल मीडिया फ्रॉड यांसारख्या सायबर गुन्ह्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. 'OTP, UPI PIN आणि पासवर्ड कोणालाही देऊ नका' अनोळखी व्यक्तीला OTP, UPI PIN, पासवर्ड अथवा वैयक्तिक माहिती देऊ नये, तसेच कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करण्यापूर्वी तिची खात्री करावी, असा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. इंटरनेट, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर करताना सतर्क राहणे आवश्यक असून, संशयास्पद ऑनलाइन घटना घडल्यास घाबरून न जाता पालक, शिक्षक किंवा संबंधित व्यक्तीची मदत घ्यावी, असेही मार्गदर्शन करण्यात आले. Quick Heal Foundationच्या उपक्रमाची माहिती यावेळी Quick Heal Foundation यांच्या सायबर जनजागृती उपक्रमाबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

लहान वयातच सायबर सुरक्षेच्या योग्य सवयी लागल्यास ऑनलाइन फसवणूक आणि गैरवापरापासून विद्यार्थ्यांना स्वतःचे संरक्षण करता येऊ शकते, यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हे मार्गदर्शन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील विद्यार्थिनी दर्शना चौधरी आणि टीना पाटील यांनी केले. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सायबर सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित डिजिटल वापराची सवय लावणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

## दापोलीत अणुऊर्जा प्रकल्पाचा प्रस्ताव

जन सम्राट टाईम्स



**मुंबई । प्रतिनिधी:** रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीत २८०० मेगावॅट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे.टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडसोबत राज्य सरकारने सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिली.राज्याची स्वच्छ ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरात राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. अणुऊर्जा हा सक्षम आणि महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे आला आहे. राज्याची ऊर्जेची गरज पूर्ण करताना ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीमुळे अणुऊर्जेच्या निर्मिती क्षमतेत मोठी वाढ शक्य होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार अभिमन्यू पवार, संबंधित अधिकारी, टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडचे प्रतिनिधी उपस्थित होते. अखंडित वीजपुरवठ्यासाठी आवश्यक मूलभूत वीजभाराचा विचार करता अणुऊर्जा हा प्रभावी आणि स्वच्छ पर्याय आहे. अणुऊर्जा क्षेत्रात राज्याने यापूर्वी केंद्र सरकारच्या तसेच खासगी कंपन्यांसोबत तीन करार केले आहेत. अमेरिकेतील प्रमुख अणुऊर्जा कंपन्यांच्या शिष्टमंडळासोबतही यासंदर्भात चर्चा झाली असून, त्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उत्सुकता दर्शविली आहे, असे फडणवीस म्हणाले.टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड सोबत झालेल्या या दोन करारांमुळे महाराष्ट्राच्या अणुऊर्जा निर्मिती क्षमतेला आणखी बळ मिळणार आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडचे अभिनंदन केले. करारात जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड यांच्या अणुऊर्जा प्रकल्पाचा समावेश आहे. हा प्रकल्प रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील भिवबुंदर (आगरी गाव) येथे प्रस्तावित असून, त्याची क्षमता एकूण २८०० मेगावॅट इतकी आहे. प्रकल्प दोन टप्प्यांत राबविण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात १४०० मेगावॅट आणि दुसऱ्या टप्प्यात १४०० मेगावॅट क्षमतेची निर्मिती प्रस्तावित आहे. जेएसडब्ल्यू एनर्जीच्या या प्रकल्पासाठी सुमारे ४४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, पहिल्या टप्प्यासाठी २२ हजार कोटी रुपये आणि दुसऱ्या टप्प्यासाठी २२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीत २८०० मेगावॅट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे.टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडसोबत राज्य सरकारने सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिली.स्वच्छ ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी सौर आणि राज्याची ऊर्जेची गरज पूर्ण करताना ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीमुळे अणुऊर्जेच्या निर्मिती क्षमतेत मोठी वाढ शक्य होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

## गोदावरी नदीपात्र कोरडे; पाणीसाठा झपाट्याने घटला!

जन सम्राट टाईम्स




**गंगाखेडा (प्रतिनिधी):** गंगाखेड तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात आटल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. नदीपात्रातील अनेक भागांत अत्यल्प पाणी शिल्लक राहिले असून, विस्तीर्ण नदीपात्राचा मोठा भाग कोरडा पडला आहे. त्यामुळे आगामी काळात तालुक्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत असून नागरिक आणि शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. सध्या नदीच्या विस्तीर्ण पात्रातील बहुतांश भाग उघडा पडलेला असून केवळ काही ठिकाणी अरुंद प्रवाहातून पाणी वाहताना दिसत आहे. नदीपात्रातील घटत्या पाणीसाठ्यामुळे गोदावरीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या परिसरातील गावांसमोर भविष्यातील पाणी उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. नदीपात्रात कचऱ्याचे साम्राज्य पाणीसाठा घटल्याने नदीपात्रातील प्लास्टिकच्या बाटल्या तसेच इतर कचरा मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्यामुळे पाणीटंचाईसोबतच नदी स्वच्छतेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याची गरज व्यक्त होत आहे. पाणी, शेती आणि जनजीवन गोदावरीवर अवलंबून गोदावरी नदीवर परिसरातील अनेक गावांचे पिण्याचे पाणी, शेती आणि दैनंदिन जनजीवन मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे नदीतील घटता पाणीसाठा हा केवळ पर्यावरणीय प्रश्न नसून नागरिक आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही गंभीर बाब ठरत आहे. नदीपात्रातील सद्यस्थिती लक्षात घेता प्रशासनाने पाणी संवर्धनाच्या उपाययोजना, नदी स्वच्छता आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी आतापासूनच ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. गंगाखेड तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात आटल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. नदीपात्रातील अनेक भागांत अत्यल्प पाणी शिल्लक राहिले असून, विस्तीर्ण नदीपात्राचा मोठा भाग कोरडा पडला आहे.

## Z.A. उर्दू ज्युनिअर कॉलेजमध्ये गंभीर तक्रारींनी खळबळ; शिक्षकाविरोधात विद्यार्थ्यांच्या तक्रारी!

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर। प्रतिनिधी:** मलकापूर येथील Z.A. उर्दू ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी कथित गैरवर्तनासंदर्भातील गंभीर तक्रारी समोर आल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शिक्षक जावेद अथर अब्दुल जलील यांच्याविरोधात काही विद्यार्थी व पालकांनी मानसिक त्रास, सार्वजनिक अपमान, धमकावणे तसेच अनुचित पद्धतीने स्पर्श केल्याचे आरोप केले आहेत. या तक्रारींमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित शिक्षकांकडून विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव आणला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वर्गात विद्यार्थ्यांचा सर्वांसमोर अपमान करणे, धमकावणे तसेच अपमानास्पद पद्धतीने शिक्षा केल्याचेही तक्रारीत नमूद असल्याचा दावा पालकांनी केला आहे. गुणांच्या दबावाचा आरोप; विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण? तक्रारीत 'प्रॅक्टिकलचे गुण देणार नाही' आणि 'परीक्षेत नापास करतो' अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचा दावा करण्यात आला आहे. गुण



आणि परीक्षेच्या भवितव्याचा दबाव टाकून विद्यार्थ्यांना तक्रार करण्यापासून रोखले जात असल्यास ही बाब गंभीर असल्याची प्रतिक्रिया पालकांकडून व्यक्त होत आहे. एक-दोन नव्हे, अनेक तक्रारींचा दावा या प्रकरणात तक्रार केवळ एका विद्यार्थ्यापुरती मर्यादित नसल्याचा दावा पालकांकडून करण्यात आला आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कथित गैरवर्तनाबाबत तक्रारी केल्याचे सांगण्यात येत असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची सखोल आणि वस्तुनिष्ठ चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याची मागणी तक्रारदार पालकांनी विद्यार्थ्यांचे जबाब पालकांच्या उपस्थितीत नोंदवावेत, तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांची ओळख गोपनीय ठेवावी आणि चौकशीदरम्यान विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा दबाव येणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी केली आहे. या तक्रारीच्या प्रती जिल्हा शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग, शिक्षण संचालक पुणे, अल्पसंख्याक विभाग तसेच संबंधित शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. शिक्षण विभागाच्या भूमिकेकडे लक्ष विद्यार्थ्यांच्या तक्रारींमध्ये करण्यात आलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याने शिक्षण विभाग या प्रकरणाची कितपत दखल घेतो, याकडे मलकापूरकरांचे लक्ष लागले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित तक्रारी असल्याने त्यांची तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशीद्वारे वस्तुस्थिती समोर आणणे आवश्यक असल्याची मागणी पालकांकडून होत आहे. nदरम्यान, तक्रारीतील आरोप अद्याप सिद्ध झालेले नसून, त्यांची सत्यता अधिकृत चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे.

## धुळ्यात मराठा समाजाचा रास्ता रोको; मुंबईत धडकण्याचा इशारा!

### 'आरक्षणाचा प्रश्न तातडीने सोडवा, अन्यथा मुंबई जाम करू' — आंदोलकांचा इशारा

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी धुळ्यात मराठा समाज पुन्हा आक्रमक झाला आहे. शहरातील शिवतीर्थ चौकात मानवी साखळी करून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आरक्षणाचा प्रश्न शासनाने तातडीने सोडवावा, अन्यथा आगामी गणेशोत्सवातच मुंबई जाम करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. रास्ता रोकोमुळे शिवतीर्थ चौक परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली होती. आंदोलकांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आरक्षणाच्या मागणीचा आवाज बुलंद केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. 'बलवान मुख्यमंत्री कमजोर कसे?' यावेळी आंदोलकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेवरही जोरदार टीका केली. 'मुख्यमंत्री बलवान असतील तर मराठा आरक्षणाचा प्रश्न का सुटत नाही?' असा संतप्त सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप करत, महायुतीतील मराठा आमदारांवर दबाव असल्याचा दावाही आंदोलनकर्त्यांनी केला. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणी यावेळी करण्यात आली. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला बारा दिवस पूर्ण झाल्याचा दावा आंदोलकांनी केला. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासह विविध मागण्या शासनासमोर ठेवण्यात आल्या आहेत. उपोषणामुळे जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत असल्याचा दावा करत, त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी धुळ्यातील मराठा समाज रस्त्यावर उतरल्याचे आंदोलकांनी सांगितले. 'प्रश्न निकाली न काढल्यास आंदोलन तीव्र करणार' शासनाने मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. 'आरक्षणाचा प्रश्न सोडवा, अन्यथा मुंबई जाम करू,' असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. शेकडो समाजबांधवांचा सहभाग या आंदोलनात माजी आमदार शरद पाटील, भानुदास बगदे, रणजीत राजे भोसले, विनोद जगताप, राजेंद्र काळे, वामन मोहिते, भैय्या शिंदे, वीरेंद्र मोरे, विक्रम काळे, हेमंत भडक, प्रफुल माने, गोविंद वाघ, उल्हास यादव, ॲड. दिनेश काळे, श्रीरंग जाधव, जितू घोरपडे, आबा कदम, राकेश भोसले, शरद मराठे, संदीप सूर्यवंशी, अमर फरताडे, मनोज ढवळे यांच्यासह शेकडो मराठा समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान, आंदोलनादरम्यान करण्यात आलेले मुख्यमंत्री व शासनावरील आरोप हे आंदोलकांचे दावे असून, संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया प्राप्त झाल्यानंतर त्यांची बाजूही स्पष्ट होऊ शकते.

## संत सेनाजी महाराजांची पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात संपन्न!

जन सम्राट टाईम्स

**कासोदा | प्रतिनिधी:** येथील श्री संत सेनाजी महाराज यांची पुण्यतिथी नाभिक समाजाच्या वतीने श्रीराम मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने पारंपरिक वाद्यांच्या गजरात तसेच नृत्याच्या उत्साहात संत सेनाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. पालखी मिरवणुकीस श्रीराम मंदिर येथून सुरुवात झाली. बिर्ला चौक, मेन रोड, भाईगल्ली, दक्षिणमुखी हनुमान मंदिर मार्गे पुन्हा बिर्ला चौकातून मिरवणूक श्रीराम मंदिर येथे आणण्यात आली. मिरवणुकीदरम्यान समाजबांधवांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीची सांगता झाल्यानंतर श्री संत सेनाजी महाराजांच्या पालखीचे व प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी समाजातील महिला, पुरुष तसेच युवकांनी उत्स्फूर्तपणे व स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला. यानंतर नाभिक समाजाचे कार्यकर्ते सुधीर भिकन सोनवणे यांच्या हस्ते सपत्नीक सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले. पूजेनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. समाजबांधवांसह परिसरातील नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष विनोद ठाकरे, उपाध्यक्ष अजय निकम, सचिव गणेश ठाकरे, माजी अध्यक्ष राजेंद्र ठाकरे, माजी उपाध्यक्ष वसंत सोनवणे यांच्यासह बाळा सोनवणे, जितेंद्र ठाकरे, अशोक ठाकरे, सुरेश ठाकरे, गोपाल देवरे, समाधान जाधव, सागर ठाकरे, गोपाल निकम, अशोक सोनवणे, धनराज सोनवणे, आबा देवरे, विजय निकम, अमर देवरे, सचिन देवरे, समाधान ठाकरे तसेच इतर समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिश्रम घेतले.

# शिक्षण, संघटन आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल!

## श्री. मुंजा शिवाजी गिरी यांना 'महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार' घोषित

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** क्षण, सामाजिक आणि संघटनात्मक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय योगदान देणारे बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील शिक्षक श्री. मुंजा शिवाजी गिरी यांच्या कार्याची दखल घेत त्यांना मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणारा अत्यंत मानाचा 'महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार' घोषित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या पुरस्काराच्या घोषणेनंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी, ४ सप्टेंबर रोजी डॉ. आंबेडकर ट्रस्ट, वरळी यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिक्षक पुरस्कारानेही त्यांचा गौरव करण्यात आला. एकापाठोपाठ मिळालेल्या या दोन मानाच्या पुरस्कारांमुळे शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून श्री. मुंजा शिवाजी गिरी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. १४ वर्षांची ज्ञानसेवा श्री. मुंजा गिरी हे १६ जुलै २०१२ रोजी शिक्षण क्षेत्रात रुजू झाल्यापासून गेल्या १४ वर्षांपासून निष्ठेने अध्यापनाचे कार्य करीत आहेत. बी.एड., डी.एड. आणि एम.ए. (शिक्षणशास्त्र) अशा शैक्षणिक पात्रता असलेल्या गिरी यांनी आपल्या अध्यापन कौशल्यातून आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली



आहे. ते सध्या खेरनगर इंग्रजी शाळा क्रमांक १, बांद्रा पूर्व येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान श्री. गिरी यांच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला विशेष प्राधान्य देण्यात आले. शाळेचा १०० टक्के वार्षिक निकाल राखण्यात त्यांनी सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. ई-लर्निंग, डिजिटल शिक्षण आणि आधुनिक अध्यापन पद्धतींचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना बदलत्या शैक्षणिक प्रवाहाशी जोडण्याचे काम त्यांनी केले. तसेच 'स्वच्छ, सुंदर व हरित शाळा' अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली. क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या गुणवत्तेला वाव देण्याचे कामही त्यांनी केले आहे. पालक आणि शाळा यांच्यातील संवाद व समन्वय वाढवून शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

कर्मचारी व दिव्यांगांच्या हक्कांसाठी संघटनात्मक कार्य अध्यापनाच्या कार्यासोबतच श्री. मुंजा गिरी यांनी सामाजिक आणि संघटनात्मक क्षेत्रातही सक्रिय योगदान दिले आहे. म्युनिसिपल समर्थ कामगार संघटना (कोड क्र. ५३) येथे ते सहसरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत. तसेच प्रहार दिव्यांग कर्मचारी संघटना, मुंबईचे अध्यक्ष म्हणून दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी आणि न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. याशिवाय शिक्षक सेना (कोड क्र. १५) मध्ये त्यांनी तब्बल १० वर्षे कार्यालयीन चिटणीस म्हणून संघटनात्मक जबाबदारी प्रभावीपणे सांभाळली आहे. यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी सन्मान श्री. मुंजा शिवाजी गिरी यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची यापूर्वीही विविध पुरस्कारांनी दखल घेण्यात आली आहे.

## साळवा फाट्यावर बसथांबा पूर्ववत करा!



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव। प्रतिनिधी:** साळवा फाटा येथे गेल्या तीन महिन्यांपासून एसटी बसेस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वेळेवर बस उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप करीत संतप्त विद्यार्थ्यांनी बुधवारी सकाळी साळवा फाट्यावर निदर्शने केली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे धरणगाव तालुकाप्रमुख जयदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनातून एसटी प्रशासनाचा निषेध करण्यात आला.


साळवा, साकरे, निशाणे आणि गोंदेगाव परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज चोपडा, धरणगाव आणि जळगाव येथे ये-जा करतात. मात्र साळवा फाट्यावर बसथांबा बंद असल्याने विद्यार्थ्यांना वेळेवर महाविद्यालयात पोहोचणे कठीण झाले आहे. परिणामी त्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

वारंवार मागणी करूनही समस्या कायम साळवा फाट्यावर एसटी बसेस थांबविण्याची व्यवस्था पूर्ववत करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून आणि स्थानिकांकडून वारंवार करण्यात आली आहे. मात्र त्यानंतरही समस्या कायम असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## भुसावळ तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली

### खरीप पिके सुकण्याच्या मार्गावर



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** खरीप हंगामाला सुरुवात होऊन पिकांची उगवण झालेली असतानाच गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने भुसावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे. सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसामुळे मध्यम व काळपट जमिनीतील पिकांनी तग धरला असला, तरी आता पावसाने आणखी ओढ दिल्यास खरीप पिकांवर गंभीर संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाच्या लहरीपणामुळे आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणारा शेतकरी पुन्हा संकटाच्या छायेत आला आहे.

उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि शेतमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याच्या समस्यांमध्ये आता पावसाचे संकटही भर पडली आहे. कापूस लागवडीत २,७४४ हेक्टरची घट भुसावळ तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामावर हवामानातील बदलाचा परिणाम जाणवत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तालुक्यात कापूस लागवडीच्या क्षेत्रात तब्बल २,७४४ हेक्टरची घट झाल्याचे समोर आले आहे. ऑगस्ट तसेच सप्टेंबरच्या सुरुवातीला अनेक भागांत पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने कापूस, मका, मूग आणि उडीद यांसारखी महत्त्वाची खरीप पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. पावसाबरोबरच आत्महत्यांचे संकटही कायम एकीकडे पावसाअभावी पिकांची चिंता वाढली असताना दुसरीकडे शेतकऱ्यांकडून जीवन संपवण्याचे सत्रही थांबलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत जळगाव जिल्ह्यात ९९ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. यापैकी ४७ प्रकरणे शासकीय मदतीसाठी पात्र, तर २२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत.

तब्बल ३० प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि मानसिक अडचणींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. प्रशासनाच्या मदतीची अपेक्षा पावसाने आणखी ओढ दिल्यास खरीप पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिकांची सद्यस्थिती, पावसाची परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींचा प्रशासनाने तातडीने आढावा घेणे गरजेचे आहे. पावसाची प्रतीक्षा, हातात आलेल्या पिकांची चिंता आणि डोक्यावरचे कर्ज अशा तिहेरी संकटात भुसावळ तालुक्यातील शेतकरी सापडला आहे. त्यामुळे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सातपुड्याच्या जंगलात अडावद पोलिसांची धडक कारवाई!

### १७५ झाडे जप्त सोयाबीन-तुरीच्या आड सुरू होती अवैध लागवड

जन सम्राट टाईम्स

**चोपडा । प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेला अडावद पोलिसांनी मोठे यश मिळवून दिले आहे. सातपुड्याच्या जंगलातील देवगड शिवारात वनविभागाच्या क्षेत्रात सुरू असलेली अवैध गांजाची शेती पोलिसांनी उद्ध्वस्त केली. या कारवाईत ओल्या हिरव्या गांजाची तब्बल १७५ लहान-मोठी झाडे जप्त करण्यात आली असून, त्यांचे एकूण वजन १ किलो ३१० ग्रॅम आहे. जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत २६ हजार २०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात "ड्रग्स फ्री जळगाव" आणि "नशामुक्त भारत" अभियानांतर्गत अंमली पदार्थांची वाहतूक, विक्री, सेवन तसेच अवैध लागवडीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान अडावद



पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे यांना देवगड शिवारातील वनविभागाच्या कंपार्टमेंट क्रमांक १६९ मध्ये बेकायदेशीर गांजाची लागवड होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाड टाकली. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या पाहणीत सोयाबीन आणि तुरीच्या पिकाच्या आड लपवून गांजाची लागवड केल्याचे उघड झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून गांजाची १७५ झाडे जप्त केली. मध्य प्रदेशातील आरोपी अटकेत या कारवाईत पोलिसांनी देवसिंह रावल्या बारेला (वय ४४) याला घटनास्थळावरून अटक केली. आरोपी हा मूळचा सोनखेडी, ता. वरला, जि. बडवाणी, मध्य प्रदेश येथील रहिवासी असून, सध्या अनेर नदीच्या काठावरील झोपडी, देवगड शिवार, ता. चोपडा येथे राहत असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी अडावद पोलीस ठाण्यात गु.र.नं. १७८/२०२६ अन्वये NDPS Act, १९८५ मधील कलम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे करीत आहेत. पोलिसांच्या पथकाची उल्लेखनीय कामगिरी ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते (चाळीसगाव) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## बैलापासून ट्रॅक्टरपर्यंत; बदलत्या शेतीसोबत पोळ्याचेही बदलते रूप

### संत ज्ञानेश्वर विद्यालयात आधुनिक पोळ्यानिमित्त ट्रॅक्टर पूजन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** मेहरूण येथील श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात पोळा सणाचे औचित्य साधून आधुनिक शेतीतील यांत्रिकीकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने आगळ्यावेगळ्या पद्धतीने ट्रॅक्टर पूजनाचा उपक्रम राबविण्यात आला. पूर्वीच्या काळात पोळा सणाला शेतकऱ्याच्या शेतीतील जिवाभावाचा साथीदार असलेल्या बैलांची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जात असे. मात्र बदलत्या काळानुसार शेतीच्या पद्धतीत मोठे परिवर्तन झाले असून यांत्रिकीकरणामुळे ट्रॅक्टरने शेतीच्या कामात महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. याच बदलत्या शेती संस्कृतीची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, यासाठी विद्यालयात ट्रॅक्टरची आकर्षक फुलांनी सजावट करून त्याचे विधिवत पूजन व औक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारंपरिक



पोळ्यापासून आधुनिक पोळ्यापर्यंत यावेळी विद्यार्थ्यांना पारंपरिक पोळा आणि आधुनिक पोळा यातील बदलांची माहिती देण्यात आली. बैल हा शेतकऱ्याचा पारंपरिक साथीदार, तर ट्रॅक्टर हा आधुनिक शेतीचा महत्त्वाचा आधार असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी शेतकरी, शेती आणि निसर्ग यांच्यातील नाते आजही तितकेच घट्ट आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला. "साधने बदलली, शेतीची पद्धत बदलली; मात्र शेतकऱ्याचा कष्ट आणि शेतीशी असलेला जिव्हाळा कायम आहे," असा भावपूर्ण संदेश यावेळी देण्यात आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग ट्रॅक्टरला फुलांची आकर्षक सजावट करून त्याचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोळ्याच्या आठवणींसोबत आधुनिक शेतीतील साधनांचे महत्त्व जाणून घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शेतीतील बदल, यांत्रिकीकरण आणि शेतकऱ्याच्या कष्टांची जाणीव करून देण्यास मदत झाली. मुकेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. मेहरूण येथील श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात पोळा सणाचे औचित्य साधून आधुनिक शेतीतील यांत्रिकीकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने आगळ्यावेगळ्या पद्धतीने ट्रॅक्टर पूजनाचा उपक्रम राबविण्यात आला.

## सारोळा शाळेत सावळेश्वर शेतकरी गटाच्या वतीने वृक्षारोपण

जन सम्राट टाईम्स

**अहिल्यानगर । प्रतिनिधी:** ल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथील शालेय परिसरात सावळेश्वर शेतकरी गट, सारोळा यांच्या वतीने विविध फळझाडांसह इतर वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. शालेय परिसर अधिक हिरवागार आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सावळेश्वर शेतकरी गट हा महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या अंतर्गत कार्यरत आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच विद्यार्थ्यांमध्ये वृक्षांविषयी जिव्हाळा आणि निसर्ग संवर्धनाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने शालेय परिसरात पेरू, आंबा, चिकू, जांभूळ यांसह विविध झाडांची लागवड करण्यात आली. वृक्षलागवडीसोबत संगोपनाची जबाबदारी केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प शेतकरी गटाच्या सदस्यांनी यावेळी केला. वृक्षांची नियमित देखभाल करून ती मोठी करण्याची जबाबदारीही गटाच्या सदस्यांनी स्वीकारली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व केवळ पुस्तकी ज्ञानातून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून अनुभवण्याची संधी मिळाली. शाळेच्या परिसरात वाढणारी हिरवाई भविष्यात विद्यार्थ्यांसाठी निसर्गाशी जोडणारे सुंदर शैक्षणिक वातावरण निर्माण करणार आहे. शेतकरी गटाच्या सदस्यांचा सहभाग या वृक्षारोपण उपक्रमात श्री. ज्ञानेश्वर कल्याण जगदाळे, श्री. गणेश मोहन काशीद, श्री. हरिभाऊ शिवाजी मुळे, श्री. बापूराव नामदेव तांबे, श्री. किशोर यादवराव पवार, श्री. संदिप यादवराव पवार, श्री. राजेंद्र नारायण मुळे, श्री. गणेश मनोहर काशीद, श्री. अशोक सुदाम काशीद, श्री. अशोक विश्वनाथ भोसले आणि श्री. रामभाऊ एकनाथ तांबे यांनी सहभाग घेतला. यावेळी शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. शालेय परिसरात राबविण्यात आलेला हा वृक्षारोपण उपक्रम पर्यावरण संवर्धन, शेतकरी सहभाग आणि विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम रुजविण्याच्या दृष्टीने प्रेरणादायी ठरला.

## नाहाटा महाविद्यालयात ललित कला स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

### विविध विषयांवर विद्यार्थ्यांची कलात्मक अभिव्यक्ती



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी :** भुसावळ येथील कला, विज्ञान व पी. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात ९ सप्टेंबर २०२६ रोजी ललित कला स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच सामाजिक, पर्यावरणीय आणि समकालीन विषयांकडे कलात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळावी, या उद्देशाने विविध स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. दीपक पाटील, उपप्राचार्य डॉ. जी. आर. वाणी, कार्यालय प्रबंधक श्री. भगवान तायडे आणि कला मंडळ प्रमुख डॉ. प्रफुल्ल इंगोले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

विविध कलाप्रकारांत विद्यार्थ्यांची सर्जनशीलता ललित कला स्पर्धांमध्ये रांगोळी, मेहंदी, व्यंगचित्र, कोलाज, इन्स्टॉलेशन, फोटोग्राफी, स्पॉट पेंटिंग, पोस्टर मेकिंग आणि क्ले मॉडेलिंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना समकालीन आणि सामाजिक विषय देण्यात आले होते. महिला सबलीकरण, स्वच्छ भारत अभियान, डिजिटल इंडिया, जेन झी, भारतीय संस्कृती व सण-उत्सव, सोशल मीडियाचे फायदे व तोटे, वन्यजीव संरक्षण, माझ्या स्वप्नातील भारत, पर्यावरणीय बदल, मोबाईलच्या आहारी गेलेली तरुणाई, महागाई, भ्रष्टाचार, राजकारण तसेच AI आणि मानवी जीवन आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृती साकारल्या. विविध विषयांवरील विद्यार्थ्यांच्या कलात्मक मांडणीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत एकूण ९९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शिक्षकांचे मोलाचे सहकार्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. वंदना महाजन, डॉ. विद्या पाटील, प्रा. नयना चौधरी, डॉ. दिनानाथ पाठक, डॉ. सचिन राजपूत, प्रा. प्रणिता राणे, प्रा. सपना जंगले, डॉ. एस. के. राठोड, प्रा. नेहा महाजन, प्रा. गौतम भालेराव, डॉ. कविता पांडव, डॉ. प्रियंका महाजन, डॉ. जितेंद्र आडोकार, प्रा. ज्ञानेश्वर जावळे, प्रा. सुनील अडकमोल, डॉ. शलाका निकम आदींनी सहकार्य केले. मान्यवरांनी केले परीक्षण ललित कला स्पर्धांचे परीक्षण डॉ. रश्मी शर्मा, डॉ. गौरी पाटील, डॉ. स्मिता चौधरी, डॉ. ममता पाटील, डॉ. उमेश फेगडे, डॉ. विलास महिरे, डॉ. हर्षल पाटील, डॉ. एस. टी. धूम, डॉ. मनोज पाटील, डॉ. किरण वारके, डॉ. सचिन येवले, डॉ. दीपक पाटील आणि डॉ. मनोज जाधव आदींनी केले.

## 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपात राजकीय व आर्थिक वशिला टाळा

### १,०५३ जागांसाठी निवड प्रक्रिया; व्हिडिओ रेकॉर्डिंग व गुणांसह अंतिम गुणवत्तायादी जाहीर करा

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपाची निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, गुणवत्ताधिष्ठित आणि कोणत्याही राजकीय अथवा आर्थिक वशिल्यापासून मुक्त ठेवण्यात यावी, अशी जोरदार मागणी जळगाव जिल्हा जनरल कामगार सेनेतर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीपकुमार साळी आणि सामाजिक कार्यकर्ते कपिल पानपाटील यांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. १,०५३ जागांसाठी निवड प्रक्रिया जळगाव जिल्ह्यातील ६८२



गावांमध्ये १,०५३ जागांवर 'आपले सरकार सेवा केंद्र' स्थापन करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. या निवड प्रक्रियेत कागदपत्रांची पडताळणी, प्रत्यक्ष पाहणी, मुलाखत तसेच १०० गुणांच्या आधारे गुणवत्तायादी तयार करण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर निवड प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय, आर्थिक किंवा स्थानिक दबाव येऊ नये, तसेच पात्र आणि गुणवत्ताधिष्ठित उमेदवारांना समान संधी मिळावी, याकडे प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मुलाखतींचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याची मागणी निवेदनात ५ व ६ ऑक्टोबर रोजी संबंधित तहसील कार्यालयांमध्ये होणाऱ्या मुलाखतींचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. निवड प्रक्रियेसाठी निश्चित करण्यात आलेले निकष स्पष्ट आणि सर्व उमेदवारांना समानपणे लागू असावेत, याचीही दक्षता घेण्याची मागणी संघटनेने केली आहे. तसेच अंतिम निवडीनंतर प्रत्येक उमेदवाराला मिळालेले गुण, गुणवत्ताक्रम आणि अंतिम गुणवत्तायादी अधिकृत संकेतस्थळावर सार्वजनिक करण्यात यावी. प्राप्त झालेल्या हरकतींचे तातडीने, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने निराकरण करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. सुशिक्षित बेरोजगारांच्या अपेक्षा प्रशासनाकडे 'आपले सरकार सेवा केंद्र'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यास मदत होते. त्यामुळे या केंद्रांच्या वाटपात गुणवत्ता, पात्रता आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक असल्याचे कामगार सेनेने म्हटले आहे. निवड प्रक्रियेतील पुढील टप्प्याकडे जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे लक्ष लागले असून, प्रशासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. जळगाव जिल्ह्यातील 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपाची निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, गुणवत्ताधिष्ठित आणि कोणत्याही राजकीय अथवा आर्थिक वशिल्यापासून मुक्त ठेवण्यात यावी, अशी जोरदार मागणी जळगाव जिल्हा जनरल कामगार सेनेतर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीपकुमार साळी आणि सामाजिक कार्यकर्ते पानपाटील यांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथाजिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.